# मराठी (कुमारभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (मार्च 2020)

**(आदर्श उत्तरांसह)**

**वेळ : 3.00 तास]** **[एकूण गुण : 80**

***सूचना :*** *(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृती काढण्याची आवश्यकता नाही. तसेच त्या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 : उपयोजित लेखन—प्र. 5. (अ) (2) 'सारांशलेखन' या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) एका शब्दात उत्तरे लिहा :** **2**

(i) फणसांच्या कोक्यांचा रंग – [ ------------------ ]

(ii) पायापासून डोकीपर्यंत फळे लादली जातात ते झाड – [ ------------------ ]

फणस? त्याला नजरेत भरण्यासारखी पालवी नसली तरी तेही टवटवीत दिसते आहे आणि त्याची फळे पायापासून डोकीपर्यंत लादली गेलेली नजरेत भरताहेत. फणसाला फुले धरत नाहीत तर पौष-माघात त्याला हिरवे कोके येतात. फुगीर मिरचीसारखे. मग एकेक कोका दुभंगतो. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते. आतला हिरवा फणस गुळगुळीत, तुकतुकीत असतो. मग काही दिवसांनी त्यावर खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात. ते दाणे वाढून पांढऱ्या किडीसारखे तंतू बनतात. त्यांच्या खालून काटे वाढतात आणि ते तंतू गळले, की संपूर्ण अवयवांनी युक्त पण आकाराने मुसुंब्याएवढा फणस तयार होतो. अगदी बुंध्यापासून ते धरतात. कधी कधी फळ अर्धे मातीत पण गाडले जाते.

रूपरसगंधमय अशा या चैत्र मासाची शोभा झाडावरच्या काही बांधल्या जाणाऱ्या आणि काही बांधल्या गेलेल्या पक्ष्यांच्या घरट्यांनी पूर्णत्वाला येते. ठिकठिकाणी काही लोंबत्या आकाराची, तर काही वाटोळी चेंडूसारखी, तर काही पसरट गोल, अशी ही काळीकबरी घरटी म्हणजे वसंताच्या चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात मला.

**(2) चूक की बरोबर ते लिहा :** **2**

(i) चैत्रात फणस फुलांनी डवरतो. – [ --------------------- ]

(ii) कधी कधी फणसाचे फळ अर्धे मातीत पण गाडले जाते. – [ --------------------- ]

**(3) स्वमत :** 3

तुम्ही अनुभवलेल्या चैत्र महिन्याचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) कृती करा :** 2

रूपाली व सोनाली यांचे सुरुवातीच्या दिवसांतील एकमेकींशी वागणे →
→

सुरुवातीला रूपालीचं आणि सोनालीचं मुळीच पटेना. रूपाली सोनालीवर भुंकायची आणि सोनालीही फिसकून अंगावर जायची. तीन चार दिवस हा प्रकार चालू होता; पण चार दिवसानंतर दोघींचीही गट्टी जमली. मग एकत्र बसणं, झोपणं सुरू झालं. हिंडताना रूपाली पुढे व सोनाली मागे. रूपाली सीनियर असल्यामुळे तो मान तिचाच होता. पुढे तर दोघींना एकमेकींचा इतका लळा लागला, की त्यांचं जेवणही एकत्र होऊ लागलं आणि रूपालीप्रमाणे सोनालीही माझ्याजवळ माझ्या पायथ्याशी झोपू लागली.

झोपायची वेळ झाली, की सोनाली उडी मारून बिछान्यात शिरे; पण चटकन झोपी जायचा तिचा स्वभावच नव्हता. बिछान्यात आली, की ती माझं तोंड चाटू लागे, मग केस चाटे. पंजानं माझे केस विस्कटून टाकी. कधी ती अन् रूपाली यांची दंगामस्ती माझ्याच बिछान्यात चालायची. दोघीही बिछान्यात चक्क नाचत, कुदत, थकल्या-दमल्या, की दोघीही आपापली जागा पकडून झोपायला येत. फुस्स करून रूपा अंग टाकी आणि झोपी जाई; पण सोनालीला मात्र अशी झोप येत नसे. लहान मुलासारखं तिला मला थोपटून झोपवावं लागे. तेव्हा कुठे बाईसाहेब झोपत.

**(2) कोण ते लिहा :** 2

(i) झोपताना लहान मुलासारखं थोपटावं लागणारी —

(ii) फुस्स करून अंग टाकून झोपी जाणारी —

**(3) स्वमत :** 3

'प्राण्यांना प्रेमाने वागवले तर तेही माणसांशी प्रेमाने वागतात,' या विधानाविषयी तुमचे मत लिहा.

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :** 2

(i) आनंदी होण्याचा उपाय लिहा.

(ii) जीवनात चालू असलेला प्रत्येकाचा प्रयत्न लिहा.

जीवनात प्रत्येकाचा प्रयत्न आनंदी होण्यासाठी चालू असतो. अनेक प्रकारच्या संकटांनी ग्रस्त व त्रस्त झालेली माणसे दु:खी असावीत, यात आश्चर्य ते काय? पण जीवनातील सर्व सुविधांची सुबत्ता ज्यांच्याजवळ आहे, अशी सधन माणसेही दु:खाचीच कहाणी सांगतात. अनेक बाह्य कारणांनी स्वत:ला माणसे दु:खी बनवीत असतात. विवेकानंदांच्या मते, अहंकाररहितता व स्वार्थनिरपेक्षता यांशिवाय आनंदप्राप्ती होणार नाही.

मनुष्य मूर्खपणाने व स्वार्थाने स्वत:लाच केवळ आनंदी बनवण्याचा विचार करतो. त्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्नांची पराकाष्ठा करतो; पण खरा आनंद स्वार्थाला मारण्याने मिळणार आहे. आनंदी होण्यासाठी इतरत्र धावण्याची गरज नाही. स्वार्थी वृत्ती अशी आहे की, स्वार्थामध्ये बाधा आल्यास ती दु:खी बनवते. त्यामुळे ती स्वार्थी वृत्तीच त्यागावी. हा आनंदी होण्याचा उपाय ठरेल, असे ते म्हणतात.

**(2) आकृतिबंध पूर्ण करा :** 2

**विवेकानंदांच्या मते आनंदी होण्यासाठी आवश्यक दोन गोष्टी**

- ----------------
- ----------------

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) उत्तरे लिहा :** 2

(i) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा.

(ii) मुलगा खेळत असलेला खेळ लिहा.

तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून
खेळते आहे एक मुलगी केव्हाची.
मी पाहत राहते तिला माझ्या घराच्या झरोक्यातून.
ती मांडीवर घेते बाहुलीला
एका हातानं थोपटत तिला, चढवते आधण भाताचं
भातुकलीतल्या इवल्याशा गॅसवर.
बाजूला खेळतो आहे मुलगा हातात चेंडू घेऊन
खूप उंच उडवून चेंडू नेमका झेलतो तो हातात.
मुलगी पाहत राहते कौतुकानं त्याच्याकडे.
अचानक बाजूला ठेवून बाहुलीला ती जवळ जाते त्याच्या.
मुलगा दाखवतो तिला, आपलं कसब पुन्हा एकदा.
मुलगी चेंडू मागते त्याच्याकडे
तेव्हा तो हसून म्हणतो,
'तू भाजी बनव छानपैकी पाल्याची.' ती म्हणते,
'मी दोन्ही करू शकते एकाच वेळी. तू करशील?'
मुलगा देतो चेंडू तिच्या हातात.
उंच उडवलेला चेंडू आभाळाला शिवून
नेमका येऊन पडतो तिच्या ओंजळीत.
मुलगा पाहत राहतो आश्चर्यचकित.
तशी हसून म्हणते ती, 'आता तू.'
मांडी घालून मुलगा बसतो गॅससमोर.
दोन्ही हातांनी थोपटत झोपवतो बाहुलीला प्रथम;
मग शोधतो पातेलं भाजीसाठी.........
हळूहळू शिकेल तोही
आपलं कसब दाखवतानाच घर सांभाळणं
तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून.
माझ्या घराच्या झरोक्यातून दिसतं आहे
एक आश्वासक चित्र उद्याच्या जगाचं
जिथं खेळले जातील सारेच खेळ एकत्र.
भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात
हातात हात असेल दोघांचाही
ज्यावर सहज विसावेल बाहुली आणि चेंडू जोडीनं.

**(2) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) घराच्या झरोक्यातून पाहणारी – ----------------

(ii) चेंडूचे कसब दाखवणारा – ----------------

**(3) पुढील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा :** 2

'बाजूला खेळतो आहे मुलगा हातात चेंडू घेऊन
खूप उंच उडवून चेंडू नेमका झेलतो तो हातात.'

**(4) काव्यसौंदर्य :** 2

- **पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त होणारे अर्थसौंदर्य स्पष्ट करा :**

'तू भाजी बनव छानपैकी पाल्याची.' ती म्हणते,
'मी दोन्ही करू शकते एकाच वेळी. तू करशील?'

**प्र. 2. (आ) पुढील मुद्द्यांच्या आधारे *कोणत्याही एका* कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**

| मुद्दे | 'उत्तमलक्षण' किंवा 'खोद आणखी थोडेसे' | | |
|---|---|---|---|
| (i) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | | 1 |
| (ii) कवितेचा विषय – | | | 1 |
| (iii) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – | | | 2 |

**प्र. 2. (इ) रसग्रहण :**

- **पुढे दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा :** 4

'वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू प्रचंड सुखावतात.'

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** 6

(1) 'माणुसकी पेरणे काळाची गरज' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(2) 'यडबंबू ढब्बू' या गिरिजा कीर यांच्या बालकादंबरीतील विनोद लिहा.

(3) स्वाती महाडिक यांनी स्वत:चा निर्धार पूर्ण करण्यासाठी घेतलेल्या कठोर परिश्रमाविषयी माहिती तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) समास :**

- **योग्य जोड्या जुळवा :** 2

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| (i) विद्याधन | द्विगू |
| (ii) पंचारती | इतरेतर द्वंद्व |
| | कर्मधारय |

**(2) शब्दसिद्धी :**

- **पुढील तक्ता पूर्ण करा :** 2

बिनचूक, शेजारीपाजारी, दुकानदार, वटवट.

| प्रत्ययघटित शब्द | उपसर्गघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| -------------------- | -------------------- | -------------------- |
| -------------------- | -------------------- | -------------------- |

**(3) वाक्प्रचार :**

- **पुढीलपैकी *कोणत्याही दोन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** **4**

(i) तगादा लावणे

(ii) अचंबित होणे

(iii) कान देऊन ऐकणे

(iv) कंठस्नान घालणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

(1) **पुढील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :** **1**

(i) महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे – [------------------]

(ii) केलेले उपकार जाणणारा – [------------------]

(2) **पुढील शब्दांना समानार्थी शब्द लिहा :** **1**

(i) वाट = [------------------]

(ii) शक्ती = [------------------]

(3) **पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(i) दुमत × [------------------]

(ii) नापीक × [------------------]

(4) **पुढील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** **1**

(बाल व पण हे शब्द वगळून)

बालपण.

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

- **अचूक शब्द ओळखा : *(कोणतेही चार शब्द ओळखणे.)*** **2**

(i) आधूनिक, आधुनिक, आधूनीक, आधुनीक

(ii) दीपावली, दिपावली, दिपावलि, दीपावलि

(iii) परिक्षा, परीक्क्षा, परीकशा, परीक्षा

(iv) नीर्जीव, निर्जिव, निर्जीव, नीर्जिव

(v) हार्दीक, हार्दिक, हारदिक, हारदीक

(vi) पूरस्कार, पुरसकार, पुरस्कार, पूरसकार.

**(3) विरामचिन्हे :**

- **पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा :** **1**

(i) ? – [-----------------] (ii) ! – [-----------------]

**(4) पारिभाषिक शब्द :**

- **पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :** 1

(i) Drama – [----------] (ii) Tax – [----------]

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढील कृती सोडवा :**

**(1) पत्रलेखन :**

- **पुढील निवेदन वाचा व त्याखालील *कोणतीही एक* कृती सोडवा :** 6

**'वाचा आणि प्रगल्भ व्हा'**

***अजय पुस्तकालय***

**शिवाजीनगर, औरंगाबाद**

विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

अमृतमहोत्सवानिमित्त पुस्तक खरेदीवर 20% सवलत

सवलत दिनांक – 1 जानेवारी ते 15 जानेवारी

'त्वरा करा ---------- त्वरा करा ----------- त्वरा करा.

सुवर्णसंधीचा लाभ घ्या.'

संपर्क – ajay04@gmail.com – व्यवस्थापक

अमित/अमिता जगदाळे

| वाचक या नात्याने व्यवस्थापकांना पुस्तकाची मागणी करणारे पत्र लिहा. | ← ***किंवा*** → | वाचक या नात्याने पुस्तक खरेदीवर 'सवलत' दिल्याबद्दल व्यवस्थापकांचे आभार मानणारे पत्र लिहा. |
|---|---|---|

***किंवा***

**(2) सारांशलेखन :** 6

विभाग 1 : गद्य (इ) [प्रश्न क्र. 1 (इ)] मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा : (शब्दमर्यादा प्रकारानुसार 60 ते 90 शब्द)** 10

**(1) जाहिरातलेखन :**

- **पुढील शब्दांचा योग्य उपयोग करून आकर्षक जाहिरात तयार करा :**

| सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा | माफक फी |
|---|---|
| स्थळ – हर्षल सभागृह, सोलापूर | आयोजक – भाषाप्रेमी मंडळ |
| प्रवेश मर्यादित | |

**(2) बातमीलेखन :**

- **पुढील विषयावर बातमी तयार करा :**

  'नवमहाराष्ट्र विद्यालय, शिरवळ' या विद्यालयात शिक्षक दिन साजरा झाला या समारंभाची बातमी तयार करा.

**(3) कथालेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :**

  एक गरीब मुलगा — पैसे नाहीत — शाळेचा खर्च करणे अशक्य — सकाळी पेपर टाकण्याचे काम — वाटेत पैशाचे पाकीट मिळते — प्रामाणिकपणाने पोलिसस्टेशनवर नेऊन देतो — पाकिटाच्या मालकास आनंद — बक्षीस.

**प्र. 5. (इ) पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** **8**


**(1) प्रसंगलेखन :**

चंद्रपूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग,
चंद्रपूर
❊ आयोजित ❊
जिल्हास्तरीय नाट्यस्पर्धा – पारितोषिक वितरण समारंभ
दि. 10 जानेवारी वेळ : सकाळी 10.00
प्रमुख पाहुणे – माननीय शिक्षणाधिकारी,
चंद्रपूर जिल्हा परिषद, चंद्रपूर

- वरील समारंभप्रसंगी तुम्ही तुमच्या मित्राचे/मैत्रिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(2) आत्मकथन :**

- **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**




**(3) वैचारिक लेखन :**

- 'भारत माझा देश आहे,' या विषयावर तुमचे विचार लिहा.

---

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (मार्च 2020)

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) फणसांच्या कोक्यांचा रंग – हिरवा

(ii) पायापासून डोकीपर्यंत फळे लादली जातात ते झाड – फणस

**(2)** (i) चूक

(ii) बरोबर

**(3)** एकदा वसंत ऋतूत गावी जाण्याचे भाग्य आम्हांला लाभले. तिथे गेल्यावर मन मोहित होऊन गेले. शहरात जे निसर्ग सौंदर्य जाणवलेले नाही, ते सौंदर्य मला इथे दिसले.

आता हे चाफ्याचे झाड पाहा. वास्तविक, त्या झाडाच्या रूपात आकर्षक म्हणावा असा एकही घटक नाही. पण तोच पांढरा चाफा फुलांनी डवरल्यावर पाहा. मन लोभावतेच. आपण नकळत वाकून जमिनीवर पडलेले फूल उचलतो. पाकळ्यांवरून हात फिरवतो. चिमूटभर हळदपूड अलगद सोडलेली असावी, तसा पिवळा रंग गाभ्यात शोभून दिसतो. गडद पिवळ्या रंगाच्या छोट्या छोट्या फुलांनी डवरलेली सुरंगी तर पाहतच राहावी. सूर्याचा प्रकाश पडताच, ती फुले पूर्ण उमलतात. सारे रान सुगंधाने भरून जाते. जिकडे पाहावे तिकडे कोवळी कोवळी हिरव्या रंगांची पाने आणि शेकडो रंगछटा लेवून बसलेली फुले! निसर्ग या विविध रंगांनीच आच्छादलेला असतो. हे मला आमच्या गावी कोकणात पाहायला मिळते.

**प्र. 1. (आ)**

**(1)** रूपाली व सोनाली यांचे सुरुवातीच्या दिवसांतील एकमेकींशी वागणे →
- रूपाली सोनालीवर भुंकायची.
- सोनाली फिसकारून रूपालीवर धावायची.

**(2)** (i) झोपताना लहान मुलासारखं थोपटावं लागणारी – सोनाली

(ii) फुस्स करून अंग टाकून झोपी जाणारी – रूपाली

**(3)** मी अशी कितीतरी दृश्ये पाहिली आहेत, जेथे मनुष्य आणि प्राणी यांच्यातील प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य आपणास दिसून येते. उदाहरण द्यायचे झाल्यास बाबा आमट्यांच्या आनंदवनात डॉ. प्रकाश आमटे व त्यांचे कुटुंबीय, अगदी लहान नातवंडेदेखील प्राण्यांशी खेळता-बागडताना पाहावयास मिळतात. तेथे तर पाळीव प्राणी व हिंस्र प्राणी असे दोन्ही प्रकारचे प्राणी त्यांच्या आवतीभोवती वावरत असतात.

आपण प्राण्यांना लळा लावला, तर ते सदैव आपल्याशी प्रामाणिक राहतात. ज्याप्रमाणे समोरच्या व्यक्तीच्या भावनांना माणूस त्याच भावनांद्वारे प्रतिसाद देत असतो; तसेच प्राण्यांचेही असते. आपण त्यांना त्रास दिला, मारले, अव्हेरले, तर ते दुखावतात; पण प्रेमाने वागवले तर तितकीच जाणीवही ठेवतात.

सोनाली व रूपाली या अनुक्रमे सिंहीण व कुत्री असूनसुद्धा त्यांचा लेखकाच्या घरातील वावर, घरातील इतर व्यक्तींविषयी असलेले प्रेम प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळते. त्यामुळे वरील विधानाच्या सत्यतेविषयी मला खात्री आहे. आपण सर्व प्राणिमात्रांशी प्रेमाने वागायला शिकले पाहिजे.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) स्वार्थी वृत्तीचा त्याग करणे हा आनंदी होण्याचा उपाय आहे.

(ii) जीवनात प्रत्येकाचा प्रयत्न आनंदी होण्यासाठी चालू असतो.

(2)

**विवेकानंदांच्या मते आनंदी होण्यासाठी आवश्यक दोन गोष्टी**

- अहंकाररहितता
- स्वार्थनिरपेक्षता

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश – स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व अंगीकारावे.

(ii) मुलगा खेळत असलेला खेळ – चेंडूचा खेळ.

**(2)** (i) घराच्या झरोक्यातून पाहणारी – कवयित्री

(ii) चेंडूचे कसब दाखवणारा – मुलगा

**(3)** तापलेल्या उन्हाच्या आडोशाला जेव्हा एक मुलगी भातुकलीचा खेळ खेळत होती, तेव्हा तिच्या बाजूला एक मुलगा हातात चेंडू घेऊन खेळत होता. तो हातातला चेंडू वर खूप उंच उडवून तो सहज नेमकेपणाने हातात झेलत होता.

**(4)** 'आश्वासक चित्र' या कवितेमध्ये नीरजा यांनी आधुनिक जगातील स्त्रीचे सामर्थ्य व सहभाग यांविषयी दृढविश्वास व्यक्त करताना मुलीच्या तोंडी हे उद्‌गार लिहिले आहेत.

भातुकली खेळणारी मुलगी व चेंडू उडवून झेलणारा मुलगा उन्हाच्या आडोशाला खेळत आहेत, हे दृश्य कवयित्री खिडकीतून पाहत आहे. अचानक मांडीवरची बाहुली बाजूला ठेवून मुलगी चेंडू खेळणाऱ्या मुलापाशी जाते व चेंडू मागते. मुलगा तिला हिणवतो की, तू पाल्याची भाजीच कर, चेंडू उडवणे तुला जमणार नाही. तेव्हा मुलगी त्याला अत्यंत आत्मविश्वासाने म्हणते की, मी स्वयंपाक व चेंडू उडवणे हे दोन्ही एकाच वेळी करू शकते. तू माझे काम करशील का ? मुलीच्या उद्‌गारांतून कवयित्रींनी स्त्रीचे सामर्थ्य मार्मिकपणे विशद केले आहे.

**प्र. 2. (आ)**

**(1) उत्तमलक्षण :**

(i) कवी – संत रामदास.

(ii) कवितेचा विषय – उत्तम माणसाची लक्षणे.

(iii) मला ही कविता खूप आवडली. कवितेत मांडलेले हे विचार पटकन पटण्यासारखे आहेत. ही कविता उच्चारताना, वाचताना आनंद होतो. उच्च, उदात्त विचार मनात घोळवल्याने मनही आनंदित होते. सर्व गुण-अवगुण रामदासांनी अत्यंत स्पष्टपणे, परखडपणे सांगितले आहेत. कुठेही शब्दांचा बोजडपणा नाही. प्रत्येक शब्दागणीक अर्थ स्पष्ट होत जातो. मुख्य म्हणजे दैनंदिन जीवनात वागताना आवश्यक असलेल्या गुणांचे मार्गदर्शन घडत असल्याने कविता आपली, स्वतःची, स्वतःसाठी असलेली वाटत राहते.

**(2) खोद आणखी थोडेसे :**

(i) कवयित्री – आसावरी काकडे.

(ii) कवितेचा विषय – प्रयत्न व सकारात्मकता यांचे महत्त्व.

(iii) ही कविता मला खूप खूप आवडली आहे. ही कविता वाचता वाचता मनातील निराशेचे मळभ दूर होते. प्रयत्न करीत राहण्यातच यशाचा मार्ग आहे, हे मनोमन पटते. थोड्याशा प्रयत्नाने, थोड्याशा बळानेही उमेद निर्माण होते. या शब्दांनी मनाला उभारी येते. ही कविता माणसाला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देते.

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** 'वस्तू' या कवितेत कवी द. भा. धामणस्कर यांनी निर्जीव वस्तूंनाही सजीव प्राणिमात्रांसारख्या भावना असतात, त्या संवेदनशील असतात, हे बिंबवले आहे. तसेच वस्तूंना सहानुभूतीने समजून घ्यायला हवे व त्यांना प्रेमाने वागवायला हवे, असे प्रतिपादन केले आहे.

**काव्यसौंदर्य :** बहुतेक माणसे वस्तूंना निर्जीव समजतात व त्यांच्याशी निर्दयतेने वागतात. त्यांना कसेही हाताळतात. माणसांच्या या कठोर कृत्यावर भाष्य करताना वरील ओळींत कवी म्हणतात की, कदाचित वस्तूंना जीव नसेलही आणि मनही नसेल, म्हणून त्यांना आपण कठोरपणे वागवावे का? वस्तूंना मन आहे, असे समजून जर त्यांच्याशी आपण चांगले वर्तन केले तर वस्तूंना खूप आनंद होतो. त्या सुखावतात. आपल्या कुटुंबातील त्या घटक आहेत, अशी आपुलकी आपण दाखवली तर वस्तूही आपल्याला प्रेम व माया देतील.

**भाषिक सौंदर्य :** मुक्तशैलीतल्या या रचनेमुळे कवींनी या ओळींतून रसिकांशी थेट संवाद साधला आहे. अगदी साध्या पण आवाहक शब्दांत मोठे तत्त्व बिंबवले आहे. वस्तू व माणूस यांतील स्नेहबंध आत्मीयतेने जपायला हवा, हा संदेश अगदी हळूवार पद्धतीने कवींनी दिला आहे.

**प्र. 3.**

**(1)** मातीमध्ये बी पेरले की, मातीच्या मायेच्या संस्कारांमधून वृक्ष जन्माला येतो. माती ऊन-वारा-पाऊस-वादळाची झळ सोसून बीजाची जोपासना करते. बीजाला दुष्काळाची झळ सोसावी लागू नये; म्हणून ती दुष्काळाशी सामना करते. या प्रतीकांतून कवीनं सामाजिक आशय मांडला आहे. आज भ्रष्टाचार, दैन्य, अंधश्रद्धा व इतर धर्मांध घटक यांमुळे समाज पोखरलेला आहे व त्यात माणुसकी लयाला जात आहे. अशा या आधुनिक काळात माणसांवर चांगले संस्कार होऊन माणुसकी निर्माण होणे आवश्यक आहे. म्हणून माणुसकी पेरणे म्हणजेच विवेकी माणूस निर्माण करण्याची आजच्या काळाची गरज अधोरेखित होते.

**(2)** 'कुणालाही दुःखी ठेवू नये' असा आईने ढब्बूला उपदेश केला होता. ढब्बूने तो तंतोतंत पाळला. व्याह्यांना देण्यासाठी ठेवलेले मिठाईचे ताट ढब्बूने भिकाऱ्यांना वाटले. भिकाऱ्यांना प्रचंड आनंद झाला. पण घरातली मंडळी खूप कातावली. आईचा उपदेश ढब्बूने शब्दशः पाळला. भिकारी म्हणजे माणसेच. त्यांना तरी दुःखी का ठेवावे, असा व्यापक विचार त्याने केला. लोक संकुचितच विचार करतात. सर्वांशी प्रेमाने वागावे, असे म्हणताना त्यांच्या मनात सर्व म्हणजे घरातली माणसे असतात किंवा फार फार झाले तर नातेवाईक, शेजारीपाजारी, मित्रमंडळी इत्यादी असतात. जात-धर्म यांचा विचार करू नये, असे त्यांच्या मनात नसते. यातून विसंगती निर्माण होते. ढब्बू स्वतःच्या वागण्यातून समाजातली ही विसंगती दाखवून देतो. त्यामुळे विनोद निर्माण होतो.

**(3)** पतिनिधनामुळे स्वाती आधीच दुःखाच्या खाईत लोटल्या गेल्या होत्या. त्यातच दोन मुलांना वाढवण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच येऊन पडली होती.

दुसरी एक गोष्ट स्वातींच्या मार्गात आडवी येणारी होती. आता स्वाती वयाच्या चाळिशीत पोहोचल्या होत्या. या वयात धडाकेबाज कृती करण्यास लागणारे शारीरिक-मानसिक बळ कमी असण्याचा संभव असतो. तसेच, त्यांनी सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला होता. तेथे कमालीची शारीरिक क्षमता आवश्यक असते आणि शारीरिक क्षमतेपेक्षा मानसिक बळ अधिक गरजेचे असते.

या अडचणी दूर करण्यासाठी अफाट कष्ट घ्यावे लागणार होते. परंतु कोणत्याही परिस्थितीत सैन्यात जायचेच, असा स्वाती यांचा पक्का निर्धार होता. त्यासाठी वाट्टेल ते कष्ट घेण्याची मानसिक तयारी त्यांनी केलेली होती. तसे कष्ट त्यांनी घेतलेसुद्धा. म्हणूनच त्यांना स्वतःचा निर्धार पूर्ण करता आला.

**प्र. 4. (अ)**

**(1)**

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| (i) विद्याधन | – कर्मधारय समास |
| (ii) पंचारती | – द्‌विगू समास |

**(2)**

| प्रत्ययघटित शब्द | उपसर्गघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| दुकानदार | बिनचूक | शेजारीपाजारी<br>वटवट |

**(3)**

(i) तगादा लावणे – पुन्हा पुन्हा विचारणे.

मे महिन्याची सुट्टी पडताच टटू आणि प्रीतमने गावी जाण्याविषयी अम्माच्या मागे तगादा लावला.

(ii) अचंबित होणे – आश्चर्यचकित होणे.

सर्कशीतील रोमांचक कसरती पाहून राधा अचंबित झाली.

(iii) कान देऊन ऐकणे – लक्षपूर्वक ऐकणे.

सरांचे भाषण मी कान देऊन ऐकत होतो.

(iv) कंठस्नान घालणे – ठार मारणे.

भारतीय वीर जवानांनी सरहद्दीवर दहशतवाद्यांना कंठस्नान घातले.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे – मासिक

(ii) केलेले उपकार जाणणारा – कृतज्ञ

(2) (i) वाट = मार्ग

(ii) शक्ती = ताकद

(3) (i) दुमत × एकमत

(ii) नापीक × सुपीक

(4) बालपण – (i) बाण (ii) लप.

**(2)** (i) आधुनिक (ii) दीपावली

(iii) परीक्षा (iv) निर्जीव

(v) हार्दिक (vi) पुरस्कार.

**(3)** (i) ? – प्रश्नचिन्ह

(ii) ! – उद्गारवाचकचिन्ह

**(4)** (i) Drama – नाटक

(ii) Tax – कर

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.

# मराठी (कुमारभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (नोव्हेंबर 2020)

## (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 3.00 तास]** **[एकूण गुण : 80**

***सूचना :*** *(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृती काढण्याची आवश्यकता नाही. तसेच त्या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 : उपयोजित लेखन—प्र. 5. (अ) (2) 'सारांशलेखन' या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*


---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** **2**




क्रियापद वापरताना त्यापूर्वी नामाला कोणता प्रत्यय लावायचा असतो हे नीट माहीत नसले, तरीदेखील अर्थाचा गोंधळ होतो. उदा., अंगाला लावणे आणि अंगावर घेणे, तिला हसणे (तिची चेष्टा करणे या अर्थी) आणि तिच्याशी हसणे (सहजपणे हसणे) यांत प्रत्यय महत्त्वाचा आहे. हल्ली सार्वजनिक समारंभामध्ये आणि वाहिन्यांवर प्रत्ययांची जागा अनेकदा चुकलेली असते. उदा., 'तुझी मदत करणे' याऐवजी 'तुला मदत करणे' हवे. 'त्यांचे धन्यवाद' याऐवजी 'त्यांना धन्यवाद' असे म्हणायला हवे.

भाषेमध्ये अनेक शब्द सतत येत असतात, कारण ती नदीसारखी प्रवाही असते. आपणही संगणकासंबंधी अनेक नवे इंग्रजी शब्द सातत्याने आत्मसात केले आहेत. मराठीने आजवर संस्कृत, फारसी, अरबी, कन्नड, इंग्रजी अशा अनेक भाषांमधले शब्द आपले मानले आहेत. 'टेबल' हा शब्द आता आपल्याला परका वाटत नाही; पण गरज नसताना इतर भाषांमधले शब्द आणि तेही मराठी भाषेचे व्याकरण झुगारून वापरणे योग्य नाही. 'मी स्टडी केली' म्हणण्यातून काय नवीन अर्थ कळतो? त्याऐवजी 'मी अभ्यास केला' म्हणणं योग्य नाही का?

(2) (i) कृती पूर्ण करा : 1

प्रत्ययांची जागा चुकण्याची ठिकाणे –

| | |
|---|---|
| ------------------------ | ------------------------ |

(ii) पुढील विधानांतील चुकीचे विधान ओळखून लिहा : 1

(1) मराठी भाषा इतर कोणत्याही भाषांमधील शब्द आपले मानत नाही.

(2) भाषा नदीसारखी प्रवाही असते.

(3) मराठी भाषेचे व्याकरण झुगारणे योग्य नाही.

(4) भाषेमध्ये अनेक शब्द सतत येत असतात.

(3) स्वमत : 3

'गरज नसताना इतर भाषांमधले शब्द वापरून बोलू नये' या लेखिकेच्या मताबाबत तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) (i) कोण ते लिहा : 1

लेखकांच्या हॉटेलमध्ये बराच काळ टिकून राहिलेला वेटर ---------

(ii) कृती पूर्ण करा : 1

लेखकांनी सांगितलेल्या मानवी वेटरच्या तक्रारी

(1) ---------------------- (2) ----------------------

आमच्या हॉटेलमध्ये अनेक वेटर आले आणि गेले; पण त्यांच्या कटकटी कायम होत्या. कामचुकारपणा, अचानक दांड्या मारणे, भांडणं करणे अशा तक्रारींमुळे आम्ही हैराण झालो होतो. 'वाळवंटातील हिरवळ' म्हणून नमूद करण्यासारखी एक बाब म्हणजे आमचा एक वेटर मनोज बराच काळ आमच्याकडे टिकून आहे. मन्यामध्ये बाकी अनेक दुर्गुण असले, तरी प्रामाणिकपणा आणि प्रसंगावधान हे अभावाने दिसणारे गुण त्याच्यामध्ये आहेत, म्हणून आम्ही त्याला टिकवून धरले आहे.

वेटरचा प्रश्न कायमचा निकालात काढण्यासाठी आम्ही चार रोबो वेटर खरेदी केले. मी आणि मनोजने त्यांना रामू, शामू, दिपू व विजू अशा हाका मारण्यास सुरुवात केली. आमचे दिवस बघता बघता पालटले. हॉटेल बंद केल्यानंतर रात्री अकरा ते सकाळी सहापर्यंत चारही वेटरचे चार्जिंग मी करत होतो. सकाळी सहा वाजता त्यांच्या अंगावर कडक इस्त्रीचे कपडे चढवले आणि त्यांच्या डाव्या खांद्यावरील पॉवर स्वीच सुरू केला की, ते 'गुड मॉर्निंग, सर' म्हणून कामाला लागायचे. हॉटेलच्या सर्व कामांचा समावेश असलेले मेमरी कार्ड त्यांच्या डोक्यात बसवलेले असल्यामुळे सर्व कामे ते न सांगता करत.

(2) आकृतिबंध पूर्ण करा : 2

हॉटेल मालकाने आणि मनोजने रोबो वेटरना दिलेली नावे –

| | |
|---|---|
| ---------------- | ---------------- |
| ---------------- | ---------------- |

**(3) स्वमत :** 3

'यंत्रमानव (रोबो) माणसाला पूरक आहे, पर्याय नाही', या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) (i) उत्तर लिहा :** 1

उद्यानसंवर्धकाचे काम ---------------

**(ii) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा :** 1

समतेच्या आग्रहापायी ----------------

*(अ) सामाजिक वैशिष्ट्यांचा विसर पडता कामा नये.*

*(ब) व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा विसर पडता कामा नये.*

*(क) व्यक्तिगत वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष केले तरी चालेल.*

सामाजिक समता हे एक मूल्य आहे, तत्त्व आहे, पण समता म्हणजे काय? हे कळले नाही, तर यथार्थ ज्ञानाअभावी त्यामागचे तत्त्वज्ञान उपेक्षित राहण्याची शक्यता आहे. सर्व माणसे सारखी नसतात, हे आपण पाहतो. रंग, रूप, उंची, बुद्धी, आवडीनिवडी यांच्या अपेक्षेने ती वेगवेगळी असतात. व्यक्तित्वभिन्नता हे एक शरीरवैज्ञानिक व मानसशास्त्रीय सत्य आहे. समतेच्या आग्रहापायी व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा विसर पडता कामा नये. कोणाला चित्रकार होणे आवडेल, कोणी पत्रकार होईल; कोणाचा कंठ त्याला गायकाची दिशा दाखवील, एकाच उद्यानातील नाना फळझाडांना व फुलझाडांना नाना प्रकारची फुले आणि फळे येतात. उद्यानसंवर्धक एवढेच पाहतो की, प्रत्येक झाडाला आवश्यक ते आणि आवश्यक तेवढे खतपाणी मिळाले पाहिजे. ही झाली दृष्टीतील, वृत्तीतील समानता! सामाजिक समानतेचा आशय हाच आहे.

**(2) कृती पूर्ण करा :** 2

लेखकाने सांगितलेली व्यक्तिगत भिन्नतेच्या वैशिष्ट्यांची उदाहरणे
→ --------------------------
→ --------------------------

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** 2

कवींनी वस्तूंवर मानवी भावनांचे केलेले आरोप
→ ----------------------
→ ----------------------
→ ----------------------
→ ----------------------

वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण
जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.
वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो, तर वस्तू
प्रचंड सुखावतात.

वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.
वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,
त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून
निष्कासित न होण्याची हमी द्या.

वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,
हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.
वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.
त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह
नंतरच्या काळातही.

आयुष्य संपले की, वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क
शाबूत ठेवावा.

**(2) कारणे लिहा :** 2

(i) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही; कारण –

(ii) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत; कारण –

**(3) पुढील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** 2

'वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.'

**(4) काव्यसौंदर्य :**

- **पुढील काव्यपंक्तींतून व्यक्त झालेला विचार तुमच्या शब्दांत लिहा :** 2

'वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.
त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह
नंतरच्या काळातही.'

**प्र. 2. (आ) (1) पुढील मुद्द्यांच्या आधारे *कोणत्याही एका* कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :** 2

(i) खोद आणखी थोडेसे.

(ii) तू झालास मूक समाजाचा नायक.

(1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री : ---------------

(2) प्रस्तुत कवितेचा विषय : ----------------

(3) प्रस्तुत कविता तुम्हांला आवडण्याचे अथवा न आवडण्याचे कारण :

**(2) पुढील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा :** 4

'अपकीर्ति ते सांडावी। सत्कीर्ति वाडवावी।
विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची।।'

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** 6

(1) 'बालसाहित्यिका : गिरिजा कीर' या पाठाच्या आधारे साहित्यकृतीचा आस्वाद घेताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(2) सहसंबंध स्पष्ट करा

'बी'चे झाड होणे | माणसाचे माणूसपण जागे होणे

(3) 'कठोर परिश्रमामुळेच लेफ्टनंट स्वाती महाडिक यांना स्वत:चा निर्धार पूर्ण करता आला', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) समास :**

- **पुढील तक्ता पूर्ण करा :** **2**

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| महादेव | ------------------------ | ------------------------ |
| ------------------------ | सहा कोनांचा समूह | ------------------------ |

**(2) शब्दसिद्धी :**

- **पुढील आकृती पूर्ण करा :** **2**

रस्तोरस्ती, जमीनदार, वटवट, दयाळू.

अभ्यस्त शब्द: --------- , ---------

प्रत्ययघटित शब्द: --------- , ---------

**(3) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** **4**

(i) अचंबित होणे (ii) कंठस्नान घालणे

(iii) निकराने लढणे (iv) पित्त खवळणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

(1) **पुढील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :** **1**

(i) समाजाची सेवा करणारा – ------------------

(ii) उपकाराची जाणीव न ठेवणारा – ------------------

(2) **पुढील शब्दांचे विरुद्ध अर्थी शब्द लिहा :** **1**

(i) सजातीय × ------------------

(ii) नापीक × ------------------

(3) **दिलेल्या शब्दातील अक्षरांचा वापर करून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** **1**

समाजकारण (समाज व कारण सोडून)

(4) **सहसंबंध ओळखा :** **1**

(i) पुस्तक : पुस्तके : : बाटली : ------------------

(ii) दागिना : दागिने : : ------------------ : वह्या

**(2) लेखननियमांनुसार लेखन :** **2**

- **अचूक शब्द ओळखून पुन्हा लिहा : *(कोणतेही चार)***

(i) आशीर्वाद/आर्शीवाद/आशिर्वाद/आरशिवाद

(ii) हार्दीक/हारदिक/हार्दिक/हादिर्क

(iii) पारंपरीक/पारमपारिक/पारंपरीक/पारंपरिक

(iv) दिपावली/दीपावली/दीपावलि/दिपावलि

(v) आक्सीजन/ऑक्सिजण/ऑकसिजन/ऑक्सिजन

(vi) दैनंदिनी/दैनंदीनी/दैनंदिनि/दैनदिनी.

**(3) विरामचिन्हे :** **1**

- **पुढील कोष्टक पूर्ण करा :**

| विरामचिन्ह | विरामचिन्हाचे नाव |
|---|---|
| ? | ------------------------- |
| --------------------- | एकेरी अवतरणचिन्ह |

**(4) पारिभाषिक शब्द :**

- **पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :** **1**

(i) Drama – --------------- (ii) Reservation – ---------------

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :**

**(1) पत्रलेखन :** **6**

- **पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा :**

**वाचते व्हा! लिहिते व्हा!**

**स्वानंद प्रकाशन, नवी पेठ, नगर**

यांच्यातर्फे

'***किशोर***' मासिकात प्रकाशित करण्यासाठी
विद्यार्थ्यांकडून स्वलिखित लेख/साहित्य
मागवण्यात येत आहे.

**लेखमर्यादा ५०० शब्द** **लेख स्वलिखित असणे आवश्यक**

संपर्क – swanandkishor@gmail.com

| **प्रथमेश/प्रतिमा सुर्वे**<br>विद्यार्थी या नात्याने मासिकासाठी आपला लेख स्वीकारावा, यासाठी विनंती करणारे पत्र संपादकांना लिहा. | ←― ***किंवा*** ―→ | **प्रथमेश/प्रतिमा सुर्वे**<br>विद्यार्थी या नात्याने संपादकांना यापूर्वी प्रकाशित झालेल्या अंकाची मागणी करणारे पत्र लिहा. |
|---|---|---|

*किंवा*


**(2) सारांशलेखन :** **6**

विभाग 1 : गद्य (इ) [प्रश्न क्र. 1 (इ)] मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** **10**

**(1) जाहिरातलेखन :**

- **पुढील शब्दांचा उपयोग करून 'संस्कार शिबिर'ची आकर्षक जाहिरात तयार करा :**




**(2) बातमीलेखन :**

- **पुढील विषयावर बातमीलेखन करा :**

साने गुरुजी विद्यालय, रत्नागिरी येथे 'महात्मा गांधी जयंती'निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.


**(3) कथालेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा :**

शाळा सुटण्याची वेळ — प्रत्येकालाच घाई — शाळेसमोरील रस्त्यात प्रचंड गर्दी — वाहतूककोंडी — कोंडीचे कारण न समजणे — शाळेतील पाच विद्यार्थ्यांचा पुढाकार — मदतीसाठी धावून जाणे — घरी जायला उशीर — घरचे काळजीत — घडलेला प्रसंग ऐकून घरचे आनंदित — शाळेतर्फे कौतुक.


**प्र. 5. (इ) पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** **8**

**(1) प्रसंगलेखन :**




- वरील मुद्दे केवळ मार्गदर्शक आहेत. त्यांचा आधार घेऊन तुम्ही अनुभवलेल्या पावसातील अनुभवांचे लेखन करा.

**(2) पुढील मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**




**(3)** 'पाणी हेच जीवन' या विषयावर तुमचे विचार लिहा.

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (नोव्हेंबर 2020)

**प्र. 1. (अ)**

**(1)** **मराठी भाषेने या भाषांमधील शब्द आत्मसात केले आहेत –**

- संस्कृत
- फारशी
- कन्नड
- इंग्रजी

**(2)** (i) **प्रत्ययांची जागा चुकण्याची ठिकाणे –**

- सार्वजनिक समारंभ
- वाहिन्या

(ii) **चुकीचे विधान –** (1) मराठी भाषा इतर कोणत्याही भाषांमधील शब्द आपले मानत नाही.

**(3)** परभाषेतून आपल्या भाषेत अनेक नवीन शब्द आले आहेत, ते आपण स्वीकारले आहेत.

मात्र काही वेळा परभाषेतील शब्द अकारण वापरले जातात आणि तेसुद्धा आपल्या भाषेत त्यासाठी अत्यंत सार्थ, समर्पक शब्द असताना! अलीकडे ''ती पिवळीवाली द्या'', ''तो पांढरावाला पट्टा दाखवा'' अशी वाक्ये सर्रास ऐकू येतात. वास्तविक पाहता 'पिवळी बॅग' आणि 'पिवळीवाली बॅग' यांत कोणता फरक आहे? 'पिवळी बॅग' या शब्दप्रयोगातून आधीपासूनच योग्य अर्थ व्यक्त होत असताना 'पिवळीवाली' हा नवीन शब्दप्रयोग का करावा? मराठीत 'वाला' हा प्रत्यय फक्त नामाला जोडला जातो. 'पिवळी' हे विशेषण आहे. मराठीत विशेषणाला किंवा सर्वनामाला 'वाला' हा प्रत्यय जोडण्याची प्रथाच नाही. शिवाय त्या नवीन शब्दप्रयोगाने अर्थामध्ये कोणतीही भर पडत नाही. म्हणून गरज नसताना परभाषेतील शब्द वापरून बोलू नये, हे लेखिकेचे मत योग्यच आहे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) लेखकाच्या हॉटेलमध्ये बराच काळ टिकून राहिलेला वेटर – <u>मनोज</u>

(ii) (1) <u>वेटरांचा कामचुकारपणा</u> (2) <u>दांड्या मारणे</u>

**(2)** **हॉटेल मालकाने आणि मनोजने रोबो वेटरना दिलेली नावे –**

- रामू
- शामू
- दिपू
- विजू

**(3)** आपण करीत असलेले काम योग्य की अयोग्य, चांगले की वाईट, हे यंत्राला ठरवता येत नाही. ते माणूसच ठरवू शकतो. कारण माणसाकडे मन, बुद्धी व भावना या गोष्टी असतात. यंत्राकडे मात्र या गोष्टी नसतात. माणूस स्वत:च्या बुद्धीने, स्वत:च्या अंत:करणाने काम करतो. यंत्र हे सांगकाम्या नोकर असते. त्याला सज्जन-दुर्जन, पापी-पुण्यवान हे काहीही कळत नाही. म्हणून यंत्र कधीच मानवाची जागा घेऊ शकत नाही. कामे त्वरेने, अचूक व सफाईदारपणे करण्यासाठी यंत्र मदत करते; म्हणजे ते माणसाला पूरक आहे. ते माणसाला पर्याय ठरू शकत नाही.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) उद्यानसंवर्धकाचे काम प्रत्येक झाडाला आवश्यक ते आवश्यक तेवढे खतपाणी मिळाले पाहिजे हे पाहणे.

(ii) समतेच्या आग्रहापायी व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा विसर पडता कामा नये.

**(2)** लेखकाने सांगितलेली व्यक्तिगत भिन्नतेच्या वैशिष्ट्यांची उदाहरणे →

(i) शरीरवैज्ञानिक व मानसशास्त्रीय सत्य.

(ii) दृष्टीतील व वृत्तीतील सामाजिक समानता.

**प्र. 2. (अ)**

**(1)** **कवींनी वस्तूंवर मानवी भावनांचे केलेले आरोप**

- वस्तू सुखावतात.
- लाड करून घेतात.
- वस्तू सेवक असतात.
- वस्तू मरण पावतात.

**(2)** (i) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही; कारण त्यांचे आयुष्य संपते.

(ii) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत; कारण नंतरच्या काळातही त्या आपला स्नेह जिवंत ठेवणार आहेत.

**(3)** वस्तूंविषयी सहभाव दाखवताना कवी म्हणतो – वस्तू खरे तर आपली चाकरी करतात. त्या आपल्या सेवक असतात; तरीही आपण त्यांचा सन्मान राखायला हवा. त्यांना बरोबरीच्या नात्याने वागवावे.

**(4)** 'वस्तू' या कवितेमध्ये कवी द. भा. धामणस्कर यांनी वस्तूंना कसे जोपासावे आणि त्यांच्यावर कशी माया करावी, हे विशद करताना या ओळी लिहिल्या आहेत.

कवी म्हणतो – वस्तू सजीव असतात. त्यांना जपून हाताळावे. त्यांना मायेने जपावे. लहान मुलांचे करतात, तसे वस्तूंचे लाडही करावेत. त्यांना आनंद होईल, असे त्यांच्याशी वागावे. कारण नंतर येणाऱ्या काळात (भविष्यकाळात) त्यांचे प्रेम सतत जिवंत राहणार आहे. त्यांचा स्नेह कायम राहणार आहे. त्या वस्तू आपल्यावर निरंतर मायाच करीत राहणार आहेत. त्या कधीही आपल्याला पारख्या होणार नाहीत.

**प्र. 2. (आ)**

**(i) खोद आणखी थोडेसे –**

(1) **प्रस्तुत कवितेच्या कवयित्री :** आसावरी काकडे.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय :** प्रयत्न व सकारात्मकता यांचे महत्त्व.

(3) **प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे :** ही कविता मला खूप खूप आवडली आहे. ही कविता वाचता वाचता मनातील निराशेचे मळभ दूर होते. प्रयत्न करीत राहण्यातच यशाचा मार्ग आहे, हे मनोमन पटते. थोड्याशा प्रयत्नाने, थोड्याशा बळानेही उमेद निर्माण होते. या शब्दांनी मनाला उभारी येते. ही कविता माणसाला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देते.

**(ii) तू झालास मूक समाजाचा नायक –**

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी :** ज. वि. पवार.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे माहात्म्य.

(3) **प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे :** ही कविता अतिशय चांगली आहे. ओजस्वी शब्दांनी ओतप्रोत भरलेली आहे. कविता वाचता वाचता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महानता स्पष्ट होत

जाते. त्यांनी दलित समाजाला दिलेल्या तेजाचा प्रत्यय येतो. शेवटच्या कडव्यात मात्र कलाटणी आहे. शेवटच्या कडव्याच्या आधीच्या कडव्यात प्रखर तेजाचा प्रत्यय येत राहतो. मात्र आता तोच दलित समाज शांत, थंड झाल्याची दु:खद जाणीव व्यक्त होते. ही दु:खद जाणीव शेवटच्या केवळ चार ओळींमध्ये व्यक्त झाली असतानाही आधीच्या जाज्वल्य भक्तीच्या पार्श्वभूमीवर मनाला व्याकूळ करते. हा दु:खभाव हाच या कवितेचा आत्मा आहे.

**(2) आशयसौंदर्य :** संत रामदासांनी 'उत्तमलक्षण' या कवितेत आदर्श गुणवान व्यक्तीची वैशिष्ट्ये सांगताना या ओळींमधून सद्वर्तन कशा प्रकारे करावे, याची शिकवण दिली आहे.

**काव्यसौंदर्य :** संत रामदास म्हणतात – लोक आपल्याला दूषणे देतील व निंदा करतील असे वर्तन कदापिही करू नये. ज्या वागण्याने आपली अपकीर्ती होईल, असे वागणे टाळावे. उलट आपल्या व्यक्तिमत्त्वाची कीर्ती पसरेल, अशी वागणूक करायला हवी. स्वत: चांगले वागून सत्कीर्ती वाढवायला हवी. त्यासाठी बुद्धीचा विवेक महत्त्वाचा ठरतो. सद्विचाराने, विवेकाने सत्याचा मार्ग ठामपणे आचरावा. विवेकबुद्धी ठोस असणे गरजेचे आहे.

**भाषिक वैशिष्ट्ये :** सन्मार्गाचे लक्षण सांगताना जनसामान्यांना समजतील असे तीन मुद्दे या ओळीत सहजपणे सांगितले आहेत. अपकीर्ती व सत्कीर्ती तसेच सांडावी व वाढवावी या विरोधी शब्दांमुळे ओवीची खुमारी वाढली आहे. 'दृढ धरणे' हा वाक्प्रचार चपखलपणे उपयोगात आणला आहे. जनमानसावर तत्त्व ठसवण्याची समर्थांची हातोटी समर्थपणे व्यक्त झाली आहे.

**प्र. 3.**


**(1)** साहित्यकृतीतील भावरसाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण म्हणजे साहित्यकृतींचा आस्वाद किंवा रसास्वाद होय. रसास्वाद परिपूर्ण होण्यासाठी पुढील बाबी लक्षात घ्यायला हव्यात :

कलाकृतीचा आशय किंवा कथानक, व्यक्तिरेखा मनाला पटणाऱ्या असल्या पाहिजेत. त्यांच्या स्वभावात वाचकांना किंवा प्रेक्षकांना भारावून टाकण्याची शक्ती असली पाहिजे. लेखकाची भाषाशैली, वर्णनशैली वाचनीय व प्रभावी असली पाहिजे. कथानक उत्कंठा वाढवणारे असले पाहिजे.

आपल्या समोरची कलाकृती ही कविता असेल तर त्या कवितेतून कवी कोणता भाव व्यक्त करू पाहतो, हे लक्षात घेतले पाहिजे. त्याला अनुसरून भाषा, अलंकार, प्रतिमा-प्रतीके इत्यादी आहेत का, हेसुद्धा पाहिले पाहिजे. कवितेतून उत्कट भावना व्यक्त झाल्या पाहिजेत.

कथा, कादंबरी वा नाटक असा कोणताही साहित्यप्रकार असो, साहित्यातून व्यापक मानवी मूल्ये प्रकट झाली पाहिजेत. उच्च, उदात्त असे संदेश साहित्यातून मिळायला हवेत. या सर्व गोष्टी आपल्या रसास्वादामध्ये असल्या पाहिजेत.

**(2)**




**(3)** पतिनिधनामुळे स्वाती आधीच दु:खाच्या खाईत लोटल्या गेल्या होत्या. त्यातच दोन मुलांना वाढवण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच येऊन पडली होती.

दुसरी एक गोष्ट स्वातींच्या मार्गात आडवी येणारी होती. आता स्वाती वयाच्या चाळिशीत पोहोचल्या होत्या. या वयात धडाकेबाज कृती करण्यास लागणारे शारीरिक-मानसिक बळ कमी असण्याचा संभव असतो.

तसेच, त्यांनी सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला होता. तेथे कमालीची शारीरिक क्षमता आवश्यक असते आणि शारीरिक क्षमतेपेक्षा मानसिक बळ अधिक गरजेचे असते.

या अडचणी दूर करण्यासाठी अफाट कष्ट घ्यावे लागणार होते. परंतु कोणत्याही परिस्थितीत सैन्यात जायचेच, असा स्वाती यांचा पक्का निर्धार होता. त्यासाठी वाट्टेल ते कष्ट घेण्याची मानसिक तयारी त्यांनी केलेली होती. तसे कष्ट त्यांनी घेतलेसुद्धा. म्हणूनच त्यांना स्वतःचा निर्धार पूर्ण करता आला.

**प्र. 4. (अ)**

**(1)**

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| महादेव | महान असा देव | कर्मधारय |
| षट्कोन | सहा कोनांचा समूह | द्विगू |

**(2)**

**अभ्यस्त शब्द** → रस्तोरस्ती, वटवट

**प्रत्ययघटित शब्द** → जमीनदार, दयाळू

**(3)** (i) अचंबित होणे – **अर्थ :** आश्चर्यचकित होणे.

**वाक्य :** सर्कशीतील रोमांचक कसरती पाहून राधा अचंबित झाली.

(ii) कंठस्नान घालणे – **अर्थ :** ठार मारणे.

**वाक्य :** बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंडीत शत्रूच्या सैनिकांना कंठस्नान घातले.

(iii) निकराने लढणे – **अर्थ :** शर्थीने सामना करणे.

**वाक्य :** कारगिल युद्धात भारतीय सैन्य शत्रूशी निकराने लढले.

(iv) पित्त खवळणे – **अर्थ :** खूप राग येणे.

**वाक्य :** ताईने घरभर पसारा केलेला पाहून आईचे पित्त खवळले.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) समाजसेवक (ii) कृतघ्न

(2) (i) सजातीय × विजातीय (ii) नापीक × सुपीक

(3) (i) माज (ii) रण

(4) (i) बाटली : बाटल्या (ii) वही : वह्या

**(2)** (i) आशीर्वाद

(ii) हार्दिक

(iii) पारंपरिक

(iv) दीपावली

(v) ऑक्सिजन

(vi) दैनंदिनी.

**(3)**

| विरामचिन्ह | विरामचिन्हाचे नाव |
|---|---|
| ? | प्रश्नचिन्ह |
| ‘ ’ | एकेरी अवतरणचिन्ह |

**(4)** (i) Drama – नाटक (ii) Reservation – आरक्षण.

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **‘नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी’** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.

---

❊ ❊ ❊